
# उरुमभोर

परेन शिवराम जांभळे

म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. क्र. 2822



REFBK-0022972
REFBK-0022972

संदर्भशाखा

# आत्मभोर

परेन शिवराम जांभळे

या कवितासंग्रहाच्या प्रकाशनार्थ अनुदान गौरव केल्याबद्दल महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाचे आम्ही ऋणी आहोत.

विशाल प्रकाशन

© परेन शिवराम जांभळे, द्वारा : द. भा. धामणस्कर, 'अकल्पित', गजबंधन सोसायटी, गडकरी पथ, डोंबिवली (पूर्व), ठाणे जिल्हा, ४२१ २०१

प्रथमावृत्ती : फेब्रुवारी १९८०

मुखपृष्ठ व आतील चित्रे : अरुण कालवणकर
मांडणी : विद्यागौरी राजाध्यक्ष

मुद्रक
य. श्री. रणदिवे, महाराष्ट्र सहकारी मुद्रणालय, फर्गसन महाविद्यालय रस्ता, ९१५।१ शिवाजी नगर, पुणे ४११ ००५.

प्रकाशन–संयोजक
शरदचंद्र बडोदेकर, 'संवाद', ६ सेनापती बापट सहनिवास, सेनापती बापट रस्ता, पुणे ४११ ०१६

प्रकाशक
पुंडलिक चिं. पाटील, विशाल प्रकाशन, ननावरे निवास, काटेमानिवली रस्ता, कल्याण, ठाणे जिल्हा

पूर्वप्रसिद्धी : सत्यकथा, राजस, हंस, किर्लोस्कर, स्त्री, अस्मितादर्श, प्रतिष्ठान, मराठवाडा, महाराष्ट्र टाइम्स, साधना, ऋचा, मागोवा, अबकडइ, मनोरा, मायमराठी, युगवाणी, अनुराग, बहुश्रुत, दीपांजली, माणूस, साधना, इ. इ.

श्रंदर्भ शाखा
२२९७२
काव्य
२४२२
१०।१०।८०

REFBK-0022972
REFBK-0022972

जाणाऱ्याने जायचे असते
उरलेल्यांनी जपावी खूण
वाळवंटातील पावलांवर
तळहाताने वाळू लोटून

For me thou art repose from caves,
Light even in a night of darkness,
A throng among the solitude

—*Tibbullus*

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे




झाड स्तब्ध उभं असतं. कुणालाही कुठं घेऊन जाणं त्याला भावत नाही.
गुरंवासरं, पोरंटोरं कुणीही त्याची पानं, फुलं, फळं ओरबडून घ्यावीत;
सावलीत टेकावं किंवा झाडच उपटून न्यावं.

## अनुक्रम

१. प्रवासाला निघण्यापूर्वी/२
२. जोगवा/२
३. क्षितिज उल्लंघून येताना/३
४. हरवलेल्या पायवाटांचे/३
५. रक्त गोठवणारे निर्णायक प्रपात/५
६. झाडे अस्तित्वात नसलेली/६
७. झाडांचं ठीक असतं/७
८. झाडे उभी आहेत/७
९. वैशाखवणव्यात/८
१०. चेटुक/९
११. चंद्रकला/१०
१२. प्रमेय/१०
१३. आता कुठे प्रारंभ होतोय/११
१४. मी सूर्य कोरतो/११
१५. येणारी सकाळ आपली नसते/१२
१६. तिच्या डोळ्यातील मोर/१२
१७. चित्र/१५
१८. विरागी/१५
१९. नाटक/१६
२०. पाणलोट/१७
२१. किती सहज/१७
२२. अफवांना ठोकरून/१८
२३. हुंदक्यांचे शहर/१९
२४. तळ्यात/२०
२५. हे विसरायचे ?/२१
२६. माझासुद्धा एक चंद्र होता/२१
२७. चैत्रदुपार/२२

२...

२८. ऊन/२३
२९. सूर्यफूल आणि मरण/२३
३०. मी गॅलरीत उभा/२४
३१. हा देह/२७
३२. उभ्या पावसात/२८
३३. एक नदी असते/२९
३४. मी गप्पगार/३१
३५. स्वत:च मिणमिणत राहून/३२
३६. हे शहर आणि आपण/३३
३७. मी अनिरुद्ध/३५
३८. रस्ते/३६
३९. घोडेस्वार/३८
४०. क्षितिज/३९
४१. सूर्योदय/३९
४२. तांडा/४१
४३. मी/४२
४४. आपुल्याच वेदनांचा/४३
४५. गाण्याचा समुद्र ओलांडताना/४४
४६. अकल्पित प्रदेशातील झिमझिम पाऊस/४५
४७. एकेक फूल वेचताना/४६
४८. आपण समजतो तितके/४९
४९. अयाचित/४८
५०. स्वत:पासून वेगळा होऊन/४९



## ऋतुमते

ऋतुमते,
चंद्रोदयाच्या वेळा तुझ्या डोळ्यात घुटमळताना
उसळेल तुझ्यातील समुद्र
तेव्हा मला बेशक ऐकू येऊ दे
तुझी वेल्हाळ हाक
मी आसक्त होऊन येईन
फक्त मोरांचा टाहो कानावर पडणार नाही
याची हमी घे.

## १. प्रवासाला निघण्यापूर्वी

नंतरच्या विरागी प्रवासाला प्रयाण करण्यापूर्वी
तुझं थरंगळणारं मोतीया हास्य चित्रांकित करायचं आहे.
आडवळणावर रोडावलेल्या ओढ्याला वाचून दाखवायचीय
माझी साभार परत आलेली कविता.
झालंच तर; पुन्हा जिथल्या तिथे ठेवायचा आहे
ओठांनी गोंदलेला डाव्या स्तनावरील हिरवा तीळ
मग खुशाल जाऊ दे,
गीता दत्तच्या गाण्यातून माझ्या शब्दांचे प्राण.
— बिलोरी स्वप्नांचे आरसे उंबरठ्यावर फोडूनच मी निघालो आहे.

## २. जोगवा

पौर्णिमेच्या सागरात निथळलेला चंद्र
तुषारतुरे माळून येणाऱ्या पारदर्शक लाटा
खवलून काढलेले सनातन आभाळाचे निळेशारपण
चांदण्याचे चंदेरी पान वक्राकृती चिरणारा घंटानाद
लामणदिव्यात चकाकून उठणारे धीट पाप
पाठुंगळीवर चढलेले हे देवपणाचे पुरातन कुबड
तिमिराचा स्रोत पाझरला या पत्थरातून आणि—
या इथे पाकोळ्यांनी गर्भारला गाभारा.
निबिड अरण्यात भर माघात पेटलेला पळस
आपल्याच नादात बुडालेले जर्द बावनपक्षी
धुक्याचे दही बनते घराघराच्या रांजणात
त्यांना घेरते क्षितिजरेषेचे शब्दस्पर्शी वर्तुळ.
स्वप्नभिंगाच्या ठिकऱ्या उडालेल्या असतात, त्याचवेळी
मी गोळा केलेले असतात सावल्यांचे निसरडे अर्थ.

## ३. क्षितिज उल्लंघून येताना


क्षितिज उल्लंघून येताना
कंठात वासंतिक सांगावा घेऊन
सावल्यांचे घनगर्द पक्षी केव्हाच झेपावलेत
आता थांबायला हवं.

काळोखाचा घोडा मजल दरमजल करीत
उधळताना
दीपस्तंभ अधिकाधिक तेजाळावा
तशी तुझी गांधारगाणी
वारा वेळूच्या बनात पेरीत सुटलाय
आता निघायला हवं

तिच्या कुशीचा रंग माझ्या कपाळी उमटताना
गर्द आभाळ ओथंबून आलंय
झाडं आषाढ पावसात निथळताहेत
पागोळ्यांतून वहात जाऊन
आता मिटायलाच हवं.

## ४. हरवलेल्या पायवाटांचे

हरवलेल्या पायवाटांचे डोळ्यात साकळलेले आकांत
प्रस्तरांनी पिंजून काढलेले निर्झराचे नर्तन
कलंडत्या उन्हाचे कवडसे झाडाझाडांवर ओठंगलेले
चित्रांकित पाखरांचा बेबंद चित्कार आभाळताना
पापणीबद्ध पूर्णचंद्र निसटले कपारीत
नि भर बहरात दिशांनीही नकार दिले
सावल्यांतून अंगार फुलारले त्याच वेळी
ओढाळ कविता अपरंपार का पाणावली ?



## ५. रक्त गोठवणारे निर्णायक प्रपात

रक्त गोठविणारे निर्णायक प्रपात
माझ्या बेजान देहावर लागोपाठ कोसळताहेत
अंध:काराच्या अजगराने सर्वांग गिळून टाकले
अशावेळी—
बेफाम वातचक्राला न जुमानता
पलीकडील पहाडाच्या दिशेने मला वारंवार कोण हाकारते आहे ?

## ६. झाडे अस्तित्वात नसलेली

मी पहातोय झाडे – अस्तित्वात नसलेली
कबूल आहे, या झाडांना इतिहास असणार नाही
मी येण्यापूर्वी या झाडांचे तरी कोण होते?
कदाचित त्यांच्या फांद्यांवर लटकलेली ही फुले
झिजून झिजून गोलमेल झालेल्या नक्षत्रांची असतील
किंवा; त्यांच्या पानांनी रेषारेषांवर गोंदून घेतली असतील
अजाण दु:खाची गोपुरे
इतकेच नव्हे तर, या झाडांनी बिनदिक्कत पाहिली असतील
गहिऱ्या उदासीन बुडबुड्यांची प्रतिक्षालये सजताना ....

अंधारयात्रेत सामील झालेल्या विवस्त्र दिशा
स्वप्नवद्ध धुक्याप्रमाणे पाखरांनी जवळ करताना
इथलेच पानजग गदगदून गेले असेल.
अंधाराला लक्ष डोळे फोडणारे संदर्भ
अथवा; हस्तरेषात गुंतवलेले आयुष्याचे तिरकस अर्थ...

या झाडांच्या सावल्यांनी संन्यस्त दिव्यांच्या
आकाशव्यापी घनभोर शांततेला खुणावले असेल
स्वप्नगांधार प्रहरी धूळ झटकताना
अशीच पाने उडाली असतील भन्नाट वातचक्रात
कुणी सांगावे; महालाच्या प्रवेशद्वाराची ही शिसवी लाकडे
या झाडांचीच असतील.

अस्तित्वात नसलेली झाडे का पाहू नयेत?


## ७. झाडांचं ठीकच असतं

झाडांचं एक ठीक असतं;
त्यांना ऋतुमानाप्रमाणं उत्सव साजरे करता येतात
निबिड अंधारात मुखवटे काढून मनसोक्त रडता येतं
पाखरांना एकेक विराणी देऊन अंकुरता येतं
जमलंच तर;
अशी झाडं स्वतःच पाखरं बनून उडूनसुद्धा जातात.

झाडांच ठीकच असतं;
त्यांना --
धुक्यात ओळख हरवलेल्या वनराईला संदर्भ देणाऱ्या
भन्नाट पाखरं म्हणून हाक मारता येते.

## ८. झाडे उभी आहेत

ही समुत्सुक पाखरं ज्या झाडांवर किलबिलत होती
त्या झाडांचा आक्रोश पंखाआड करून एवढ्या घाईगर्दीनं कुठं
जाताहेत ?
कदाचित त्यांना लागली असावी चाहूल शिशिरातील पानगळीची
आता झाडांना जाळून टाकीत आहे किलबिल संपून गेल्यानंतरच्या
स्तब्धतेचा वडवानल
नि एकेक अश्रुपान ढाळताना त्यांचा होतो आहे शक्तिपात
—आपापले बहरणे ओसरणे ऋतूंच्या स्वाधीन करून झाडे उभी
आहेत फक्त.



## ९. वैशाखवणव्यात

वैशाखवणव्यात उभी राहून टाहो फोडताना
पापण्यांची पाखरे तशीच मोकाट सोडून दिलीस
नि दुमडल्या आठवखुणा अंकुरताना उलगडले सत्तावीस हेमंत
व्याकुळले प्रहर सैरभैर प्रमत्तपणे

मृणालवेदना सावल्यांनी अलगद टिपताना
तळहातावर गोंदलेले विशालपक्षी
कधी भरारिले ते उमजलेच नाही !

## १०. चेटुक

मावळतीच्या डोंगररांगांना कवेत घेऊन
सुसाट वारा तिच्या स्वप्नात येतो
नि तिला विस्कटून टाकतो

सकाळी ती चक्क शीळ घालीत बसते..

## ११. चंद्रकला

तिला भिजवणारा स्पर्शविभोर पाऊस
ओठांवर अंकुरलेली ओलेती गाणी
उभार स्वप्ने
कलेकलेने वाढत जाणारा शुक्लचंद्र.

तिच्या वाटेवर गस्त घालणारे विवर्ण डोळे
काळोखकुंपणावर भेलकांडलेलं चिव पाखरू
कोसळस्वप्ने
कलेकलेने मिटत जाणारा कृष्णचंद्र.

## १२. प्रमेय

समुद्र अन् चंद्र यांचा परस्परसंबंध
हे एक शास्त्रीय सत्य असेल
किंबहुना, भेगाळलेल्या जमिनीत रुजलेले बीज
नि निद्रिस्त गर्भवतीने दिलेला हुंकार हे सुद्धा...

तसे पाहिले तर, घटातील आकाश नि आकाशातील घट
यांचा परस्परसंबंध कुंभाराला तरी कुठं माहित असतो?
तरीदेखील तो बापडा चाकावर माती फिरवीत मातीतच मिटतो ना!

त्याचा मुलगा? स्मशानातून बापाची राख सावडून घरी परततो
नंतर तो रोजच मातीशी नातं जमवतो, नवं नवं —आपसूकच.

## १३. आता कुठे आरंभ होतोय

आता सारे काही संपले आहे असे समजून
टवकारून पहाणाऱ्या ताऱ्यांना आंदण दिला एकेक जन्म
तरी ओंजळभर राहिलेच
मग ते सर्व विखरून टाकले;
--अनायासे तळे जवळच होते.

स्वप्नात तारांकित आकाश भेटीस आले;
सकाळी उठून पाहिले तर तळे कमळांनी गच्च फुललेले

दुपारी धाकटयाने माझ्या आजोबांच्या प्रतिमेला हार घातला
तो तळयात फुललेल्या कमळांचाच.

आजोबांचं नाव धाकटयाला ठेवण्यात आलं होतं;
...म्हणजे आता कुठे आरंभ होतोय म्हणायचा !

## १४. मी सूर्य कोरतो

तांबडया मातीत केव्हाचे नांगरून पडलेले गाणे
कुंवार डोळयात उतरलेली नारिंगी श्रावणछटा
पिवळी गवतफुले माळून येणारी लाडिक पायवाट
उत्तररात्री पिचलेल्या हिरव्या चुडयांची अल्लड वेलांटी
निळयाशार तलावातील झाडांची तरंगती प्रतिबिंबे
दाट गर्दीतून बाहेर पडू पहाणारे पारवे प्रश्न
सुवासिनीने निरांजन पेटवताना ऐकलेली जांभळी शीळ .....
हे असे बरेच काहीबाही घडत राहते तरीही
पांढराधोप कागद घेऊन मी फक्त सूर्य कोरतो :
डोळे-कान-नाक-तोंड-हात-पाय-सावलीसकट
नि मुकाट अंधारात डोळे सोडून देतो.

## १५. येणारी सकाळ आपली नसते

रानफुले कोमेजून कशी जातात
हे मी सांगताना
तू विलोल डोळयांनी चांदण्या मोजीत होतीस
... काय सांगत होतास ?— तू विचारलंस
तेव्हा आकाशातून खळ्‌ळकन निखळून पडणाऱ्या
ताऱ्याकडे मी फक्त बोट दाखवले.
तप्त उन्हाच्या झळा अंगाखांद्यावर लीलया झेलीत
वळणावरसुद्धा झाडं मुकाट उभी असतात
कारण त्यांना माहीत असतं,
स्वप्नफुलांचा सडा पहाटेस पडत असला तरी
येणारी सकाळ आपली नसते.

## १६. तिच्या डोळ्यांतील मोर

: १ :

अंगणात डवरलेल्या पारिजातकातून हलकेच
झिरपणारं राखी चांदणं खिडकीतून आत डोकावलं
तेव्हा तिनं खिडकीच बंद केली.
: स्वप्नपक्ष्यांना आत येण्यास सक्त मनाई आहे :
अशी सूचना दरवाजावर मनातच चिकटवून ती झोपी गेली.

: २ :

तरी तिला खूप खूप स्वप्नं पडलीच
बालकवींच्या फुलराणीगत रानावनातून हुंदडताना
ती नदीत डुंबायला लागली.
नदीचा तळ गाठला तर काहीबाही हाताशी लागलं :
चांदीचं नक्षीदार फुलपात्र, रत्नमण्यांचं लोभस फुलपाखरू
निळ्याभोर गळ्याचा खंड्या पक्षी नि—
बावरलेल्या संधिप्रकाशात त्याने आपल्या डोळ्यांतील
मोरांवर केलेली कविता.

सगळा खजिना उराशी धरून तिनं किनारा गाठला
तर डोळ्यांतून धूर ओकणाऱ्या चेटकिणीनं तो
हिसकावून घेतला नि तिच्या हातात चकचकित
सुरा देऊन करवंदीच्या जाळीत छपलेल्या
काचमणी डोळ्यांच्या सशाकडे बोट दाखवलं.
ती सुरा खुपसणार तोच काळोखाची चिरफाड करीत
डोक्यावरून टिटवी टिवटिवत गेली.
सुरा तिथंच टाकून ती पळू लागली
तर पायातील बळच कुणी काढून घेतलेलं.
ठेचकाळत कशीबशी ती घरी आली तेव्हा —
अंधारात झाडांवर किलबिलाट करणाऱ्या पाखरांना
अंगणातील पारिजातक दटावीत होता.

: ३ :

सकाळी तिने गडबडीने उठून पाहिले तर,
पारिजातकच उन्मळून पडलेला.
तिच्या अपेक्षेप्रमाणं एकही पाखरू चिरडलं गेलं नव्हतं—
—डोळ्यातील मोरांना थोपटीत ती खाली वाकली.

: ४ :

तिनं एक बारकीशी डहाळी सहज ओढली तर,
अख्खं झाडच हातात आलं.

: ५ :

किनाऱ्यावर बसून आठवणींचे एकेक गुलाब
तिने पायदळी यथेच्छ तुडवले,
रक्ताळलेली पावलं बेदरकारपणे वाळूत उमटवीत
ती पाण्यात गेली,
हात झटकून ओलेत्यानेच बाहेर आली
– तर लाटांनी तिच्या पाऊलखुणा अल्लद पुसून टाकलेल्या

: ६ :

सुरूच्या झाडाला टाऽटा करून
मागं वळून न पहाता ती निघाली
तेव्हा वारा एकटाच थरथरत होता.

: ७ :

ती गावभर भिंगरीसारखी भटकली.
तिनं पाहिलं, वीजेच्या तारेत अडकलेल्या कावळ्याचा प्राण,
भेलकांडत रस्ता क्रॉस करणारी विधवा,
ठोऽ आवाज करून जागीच थांबलेली बस,
नि वारूळातून भसाभसा बाहेर पडणाऱ्या मुंग्या.

: ८ :

ती फिरत फिरत आपल्याच घरापाशी पोचली
तेव्हा टळटळीत दुपार झाली होती
"इथं या घरात कोण रहात आहे ?"–तिनं विचारलं,
फक्त फांदीवरचा खंड्या पक्षी उडून गेला
नि फांदी थरथरत राहिली

: ९ :

...तिच्या डोळ्यांतील मोरांनी माना टाकल्या आहेत
नि तिचे हात शिवशिवताहेत.
डोळ्यांतून धूर ओकणाऱ्या चेटकिणीचा पत्ता
तिला हवा आहे.

: १० :

पण त्या अगोदर,
तिच्या डोळ्यांतील मोरांवर चेटूक करणाऱ्या
खंड्या पक्ष्याला तिला शोधावे लागेल.

## १७. चित्र

भिंतीवरील चित्रातून मी रात्री अलगद उतरतो
नि माझ्या स्वप्नात येतो
मी चित्र होतो.

सकाळ होण्यापूर्वी पुन्हा चित्रात जाऊन चपखलपणे बसतो
पुन्हा रात्र पडेपर्यंत भिंतीकडे पहाण्याचे धैर्य माझ्यात नसते.

मी मृत
माझे चित्र जिवंत.

## १८. विरागी

धुवांधार पाऊसधारा नि प्रकाशाचा फिक्कट तवंग
थरकणारी चिंब अंगे डोळ्यांच्या आरपार
पिल्लांना पंखांची ऊब:देणारी अथक चिमणी
गात्रातून हिरवे धुमारे पेटविणारे आलिंगन
—या चित्रातून मी आता उठून जात आहे.

## १९. नाटक

दिठींत प्रतिबिंबे विरताना,
तिने चाफ्याच्या झाडामागे कचबंध मोकळे सोडून
लाल काचोळी अंगावेगळी केली
मी गच्च पावसात चिंब
—हे सगळे स्वप्नात.

अलिकडे मी छत्रीशी खटपट करीत असतो
उषा लाल स्वेटर विणीत बसते.

एका झंझावाती पावसाच्या रात्री
चाफ्याचे झाड
तिच्या दिठीतील माझी हिंदकळती प्रतिबिंबे लेऊन
स्वप्नात आले.

कधी कधी असे होते;
उषा चंद्रकळा फेडीत अंधार ढवळण्याचा प्रयत्न करते
कचबंधातून निखळून पडलेल्या लालजर्द —
गुलाबपाकळ्या अंगांगावर कोसळतात
निखाऱ्यावरून चालण्याचे अग्निदिव्य
मला पार पाडावेच लागते.

## २०. पाणलोट

पाऊस संथ पडून गेला नि आपण इतके चिंब
—असे का झाले हा प्रश्न तिने
ओथंबलेल्या झाडांनाही विचारला नाही.
पंखओल्या बगळ्यांची शुभ्ररांग विस्कळीत होताना
तिने पाहिली न पाहिल्यागत करून
सुईत दोरा ओवला सराईतपणे.

इतके करूनही मोर चितारताना
कशिद्याचा एकही टाका चुकला नाही.

इथवर सारं ठीक.

आता मडक्यातून पाणी झिरपावं तशी
आठवण मनात झिरपत राहिली
आपण इतके चिंब का झालो
हा प्रश्न टाका उसवल्यागत तिला हिणवू लागला
नि तिने सोडून दिले पाणलोट डोळ्यातले.

## २१. किती सहज

किती सहज बदललो आपण !
किती सहज झुगारून दिले
परस्परसंबंधांचे मनस्वी दडपण
सिगरेटची राख टिचकीने झटकावी तसे.
उत्तररात्रीचे स्वप्नपाखरू
सकाळी उडून जावे तसे किती सहजपणे
निरोप दिले एकमेकांना
किती सहज बिनआवाजाचा पाऊस
पंखांवर झेलतंय कुणी पाखरू.
किती सहज……

## २२. अफवांना ठोकरून—

मैफिल संपल्यानंतरच्या झांजरवेळी
सावल्यांचा दाह शरीरभर भिनताना
जरासुद्धा तोल ढळू द्यायचा नाही
सर्व क्षेमकुशल असल्याचा बहाणा करायचा.

तसं आपण सर्वच गृहित धरलेलं असतं
देठापासून फूल विलगताना डहाळीचं थरथरणं
अर्धा डाव विस्कटून तुझं निघून जाणं
झिमझिम पावसाने अचानक धुवाँधार बरसणं
चंद्रास्तानंतर स्वप्नचेहरे धूसर होत जाणं......

ही पडझड अशीच होणार असेल तर,
मनातून टर्रकावून टाकायचे तिला न लिहिलेले पत्र
पहायचे नाही चित्रातले मोहरलेले झाडसुद्धा
शब्दबंधातून पाझरणाऱ्या धूसर चेहऱ्याच्या क्लांत आठवणी पांघरून
पाखरांनी नाकारलेल्या एकाकी झाडांची सोबत करायची
नंतर—
अमुक झाल्यावर तमुक होणारच या अफवांना ठोकरून
निष्पर्ण फांदीला स्वतःला लटकावून घ्यायचे.

## २३. हुंदक्यांचे शहर

आपण वीणेसारखे झंकारण्याअगोदरच
आपल्यात आत आत असे कसे उभारले गेले
हे हुंदक्यांचे शहर

मी ओहोटीच्या किनाऱ्यासारखा
उघडावाघडा पडत चाललोय
तुझे वळणावरून अचानक परतणे
आणि ही पानगळीची असह्य गाज.....

आता पर्याय एकच :
अंधाराच्या तटबंदीवर डोके आपटून
हमसून हमसून रडणे
म्हणजे हुंदक्यांचे शहर समूळ उखडले जाईल
अन्
खडकावर उरीपोटी फुटणाऱ्या लाटांच्या
दंतकथा होणार नाहीत.

## २४. तळ्यात

संध्याकाळी तळ्याकाठी :
तळ्यात मिटलेली चुकार कमळे
पाण्याला फितूर झालेलं शेवाळ
तळ्यात काजळक्षितिज निमूट उतरलेलं
बिंबवेध
तळ्यात डोळे.

संधिप्रकाश लपेटून तळ्याकाठी
डोळ्यात पिवळ्या पानांनी गोंदलेला मरणगंध
अन् आभाळालाच साद घालणार
तुझ्या गाण्यातील एकाकीपण सोबतीला
मी अंधारफुले माळून
प
र
त
कल्लोळपावले

---

डोळ्यात तळे.

## २५. विसरायचे हे ?

म्हणजे पावलांवर पावलं पडलीच नव्हती काय?
प्रकाशाने दिव्यांना सोडून देताना
कुंवार डोळ्यात झिंगलेला पेटता काळोख
परतीच्या लाटांचा फेसचुरा होताना दुर्वाळलेली आणभाक
उर्मिलेची कथा वाचताना ओघळलेले काजळपाणी
तुझ्या भांगातील विस्कटलेले दक्षिणायन
ललाटी कोरलेले सूर्यबिंबाचे अंगारशिल्प
कांती निनादून सोडणारे बिलवरांचे ग्रहगोल...
हे विसरायचे ?
मग पापण्यांवर उतरलेले चंद्र तरी जोजवायचे कशाला ?
जायचेच आहे तर —
निदान वळणावर ओठंगलेल्या संकेतांची तेवढी धूळपाटी पुसून जा.

## २६. माझासुद्धा एक चंद्र होता

कुणाला सांगू नये, पण माझासुद्धा एक चंद्र होता
धास्तावलेली सांयकाळ डोळ्यात उतरत होती
नुकताच दिसेनासा झाला होता खिडकीत थांबलेला ढग
तळ्यावरून धिटुकली लहर धावत जावी तशी
माझ्या सर्वांगातून सळसळणारी अर्धस्फुट स्पंदनं
गजाआड बोगनवेलीची अस्वस्थचित्त झालेली वेलांटी
आणखी सांगायचं तर; हळदीत अंग भिजवून
प्राजक्तसकाळ सामोरी येईस्तोपर्यंत झाडंही मुकाट उभी होती
इतक्यात कुठुनशा लंगडी घालीत येणाऱ्या झुळुकेने भुर्रकन
उडवून नेले —
आठवणींच्या पुस्तकात खुणेसाठी ठेवलेले मोरपीस.
—तेव्हापासून फुंकर घालून कळ्या फुलवणं जमलंच नाही.

## २७. चैत्रदुपार

चैत्रदुपारी हिंदकळणाऱ्या उन्हाचे उसासे
साहताना अंगांगांतील जखमांचा वणवा पेटतो
प्रतीक्षेच्या सायंप्रार्थनेत बुडालेली निरांजने
मरणाचे जन्मोत्सव साजरे करताना विझून जातात
शिशिरवनाने पांघरलेले सुनकीपणाचे जीर्ण कातडे
किनाऱ्यावर जशी वाळू तसे देहावर चिकटले
रंध्रारंध्रांनी पिऊन घेतला प्रकाश अजाणतेपणाने
आकंठ. आकंठ. अखंड. अखंड.
ही तमाम सोनसळी अंगाची उन्हे गोळा करून पेटवून द्यावीत
शत्रूची शहरे समजून
संदर्भहीन समुद्रवाऱ्यांचे निखळ अर्थ
आभास. आभास. भास. भास.
नितळ जिवणीचा घेतलेला एकच एक आवेगपूर्ण मुका
एकांत. एकांत. क्लांत. क्लांत.
या वाटांवर कुणी चेटुक केले आहे का ?
या लाटांवर कुणी स्वार झाले आहे का ?
या नक्षत्रवेळा कुठून घेऊन येतात स्वप्नपक्ष्यांचे थवे ?
अंधारात तोंड खुपसून कोण रडते आहे ?
काजव्यांचे हिरवे गाणे गाताना मन उदास होते
दिशा चुकलेल्या पाखराचा जीव जसा गलबलून येतो.

## २८. ऊन

कित्येक वर्षं झालीत
आठवणच मनाला सोडून गेलीय.
नाचानं मोराला सोडावं तशी
तरीही जाणवते अजुनही
पायांना लागलेली ओलसर वाळू
आणि पावसात भिजलेलं पिवळंधम्म ऊन.

## २९. सूर्यफूल आणि मरण

तिच्या वाटेवर सूर्यफूल बनून राहण्याचे दिवस अस्तंगले
तेव्हा पिसाट ढगांची सावली वळणावरून भुर्र पळून गेली
अधीर माळरानाला डावलून मेघांनी बोडक्या शिखरावर अभिषेक केला
तेव्हाचे स्वप्ननाळ कापून बिनपापण्यांनी जागवलेले दिवस...
अंधाराचा जाड पुठ्ठा कापीत सळईसारखा येणारा उजेड
नि बालगीतातील खोडलेल्या जोडाक्षरासारखे श्वास
अवचित उरात घुस्मटले
तेव्हा पालीच्या तुटक्या वळवळणाऱ्या शेपटीकडे मख्खपणे पहाणे जमले
—— आता आपणच आपल्या प्रेताशी पहारा करीत बसायला हरकत नाहीय.

## ३०. मी गॅलरीत उभा

: १ :

पाऊस नुकताच पडून गेलाय
मी गॅलरीत उभाच उभा रिक्त
समोरच्या खिडकीतील बाई
उत्तररात्रीचे धुमारे तिच्या डोळ्यात
कदाचित एखादं स्वप्नपाखरू
आज रविवार आहे किंवा सोमवारसुद्धा
पुढचं सर्व असंच...पारा उडालेलं
किल्ली संपलेल्या बाहुलीगत
भेलकांडत तिरपी पावलं टाकीत तो येतोय पाठीत वाकलेला
आता ती बाहेर पडेल कोणत्याही क्षणी
सारं बेतलेलं तसवीरीत ताणलेलं
॥ **तमाम स्निग्धांश काढून घेतलेले स्वरप्रहर** ॥

: २ :

हे पलिकडचं झाडही तेच आहे...वयस्क आणि वस्ताद.
पैलथडीच्या बकव्यानागत
त्याला सर्वच भानगडी माहित क्रमानुसार
झाड आता डोलू लागलंय नसलेल्या मैफिलीच्या तालावर
मी मैफिलीतून बाहेर फेकलेला
माझी स्वप्ने टांगून आलोय त्या झाडावर
वटवाघळे: माझ्यां स्वप्नांवर त्यांचा सक्तपहारा
मी या आसमंतात एकटा नाही, मी टरकावला जातोय पावलों पावली
माझे शतशः तुकडे संथप्रवाहात; माझे श्वास हरवलेत

: ३ :

रस्ते : मुरब्बी चित्रकाराच्या कुंचल्यातील
धुळीची पुटे झुडुपाझुडुपांवर
**॥ त्या अमक्या-तमक्या मासिकातून कविता लिहिणारे
परेन शिवराम जांभळे तुम्हीच काय ? ॥**
मी पंख कापलेल्या पाखरागत. मी—माझी धडपड वांझ
माझं अस्तित्व भकासशून्य. —पायाखालच्या माळागत
माझी नजर माळावरून. माळातून. माळापलीकडून
मी माळ झालोय. पहातोय सुस्त अजगराचा मिट्ट जबडा.

: ४ :

मी अजून पैलतीर बघितलं नाही
कॅबरे, विनोबा भावे, दारासिंग बघितले नाहीत
तिच्या रुसव्याचा अर्धविराम, माझं आजारपण
—आणि माझे आजोबासुद्धा आठवत नाहीत.
**॥ चल उड जा रे पंछी अब यह देश हुआ बेगाना
तेरी किस्मतमें लिखा है जिते जी मर जाना ऽऽ॥**

: ५ :

आता पाऊस पडतोय. रस्ते पिंजून गेलेत
रस्ते धुळीने माखलेत अपरंपार
रस्त्यावरील चलनी माणसं, दिवे — दगडसुद्धा
धूळ. रस्ते. माळ. दगड.
धुळीचा फेस सर्वांगातून. माझे शतशः तुकडे धुळीत
मी तुडवला जातोय, पिदवला जातोय, माझी गोची केली जातेय
माझ्या शब्दांना पाचर या धूळीखंडांची
मला तिरडीवर बांधलंय श्वासांसहित
**Hang until death**
**॥ मरणात खरोखर जग जगते ॥**

: ६ :

आता मी चौकात उभा आहे.-हुतात्मा म्हणून
युगे अठ्ठावीस किंवा अधिकसुद्धा
गळ्यात हार मफलर गुंडाळल्यागत
कदाचित सर्दीपडसे वगैरे होऊ नये म्हणूनच
(आणि एक चुकार कावळा चक्क डोक्यावर !)
मला इथून सर्वच्या सर्व दिसतंय
गॅलरी, ती बाई खिडकीआडची,
झाड. प्रवाह. पाऊस. माळ. धूळ ....
माझे शतशः तुकडे बेपत्ता. की, तुकड्यांनीच सांधलाय हा पुतळा ?

**॥ तू मुळीच चिंता करू नकोस सुखाने प्राण सोड.**
**स्मशानातील कदंबावर गुटुर्गुं करीन पारवा बनून ॥**
**तुझ्या तळमळत्या आत्माला चिरशांती लाभावी म्हणून ॥**

॥ तू मुळीच चिंता करू नकोस सुखाने प्राण सोड.
स्मशानातील कदंबावर गुटूर्गुं करीन पारवा बनून ॥
तुझ्या तळमळत्या आत्माला चिरशांती लाभावी म्हणून ॥

: ७ :

आज रविवार आहे- किंवा सोमवारसुद्धा
मी ठार अंधबधिर झालोय
पाऊस नुकताच पडून गेलाय
मी गॅलरीत उभाच उभा. रिक्त.

## ३१. हा देह

रानफुलांनी झेललेले सायंप्रार्थनेचे ओढाळ ऊनभान
तिच्या आकांत बुबुळात बुडालेली रंगांध नुपुरे
अवसानघातकी प्रस्तरांचे जीवघेणे आभासमय प्रत्यंतर
कुठेही गेले तरी हटकून पायाखाली येणाऱ्या पोरक्या वाटा
काळोखगच्च आषाढवनात झालेला कवितेचा पुनर्जन्म...
पंखांची शिडे उभारून दिशांचे बारसे करणारे सुजाण पक्षीगण
जेव्हा गंधवतीने कातरल्या डोळ्यांनी जवळ केले दीर्घ नि:श्वास—
चंद्रप्रकाशाचे रंग विटले; ती गोष्ट पुन्हा एकदा अनुभवावी.
उंबरठा ओलांडताना हा ऊर असा का भडभडून यावा ?
शब्दातीत शापदग्ध संवेदनांनी हा देह छिन्नून जावा...

## ३२. उभ्या पावसात

उभ्या पावसात चिंब
कुणी उपाशी मासोळी
गाय हंबरता दारीं
तिची भिजली काचोळी.

माथ्यावरी सूर्य जिच्या
ती माहेराची वाट चाले
त्याचे कुंकू पुसताना
पाय धुळीत पोळले.

रात उलटली तरी
डोळ्याला लागे ना डोळा
हाती घेऊनीया दिवा
कुणी बैरागी चालला


झुंजूमुंजू झाले आता
असा बरसे श्रावण
द्वारकेच्या वेशीपाशी
उभे राधेचे प्राक्तन.


## ३३. एक नदी असते

नदी असते
किनारे असतात
किनाऱ्यांवर चार घरांचं गाव.
गावकुशीत झाडे
झाडांवर हिरवे गाणे गाणारे
बावनपक्षी.

आभाळ नदीत उतरते
नदी फुसांडत वाहते
मग क्रमानं किनारे, चार घरांचं गाव.
गावकुशीतील झाडे विस्कटतात
हिरवे गाणे गाणारे बावनपक्षी
भुरं उडून जातात

नदी ओसरते
हिरवे गाणे गाणाऱ्या बावनपक्ष्यांची स्वप्ने नदीला पडतात.





## ३४. मी गप्पगार

काळोखगर्भ अवकाशात मी एकटाच
दूरस्थ दिव्यांचा प्रकाश माझ्यापर्यंत पोहोचत नाही
खूप खूप टाचा झिजल्यावर तो भेटला
त्याने हात पुढे केला माझा चेहरा निरखून
म्हणाला, प्रकाशनगरीत नेऊन सोडतो तुला.
मी हरखलो, पायांवर भिंगरी पडली
त्याच्या पावलांवर नजर ठेवून इथवर आलोय
आता तो लुप्त झालाय माध्यान्हीच्या सावलीसारखा
मला प्रकाशनगरी खुणावतेय
आता मला प्रकाशनगरीकडे जायलाच हवं
मी काळोख कोरून पितोय काचेरी डोळ्यांनी
कारण प्रेषिताच्या स्वागतासाठी उभारलेले हात छाटले गेले
ओठ घट्ट शिवले गेले
तरीसुद्धा चाललोय उरात एक झंझावात घेऊन
पण मध्येच ही माती पाय ओढू लागते; मनात पाल चुकचुकते
आपल्याला अर्ध्या वाटेवर अनाथासारखे सोडून --
अदृश्य होणाऱ्या प्रेषितांचे हातपाय याच मातीचे तर नाहीत ना ?
सांप्रत मी गप्पगार.
---काळोखपावसात भिजणाऱ्या खोपटागत.

## ३५. स्वतःच मिणमिणत राहून–

समजा, वृक्षव्याकुळ पाखराचा हिंदोळस्वर ऐकून
मी कल्लोळरानात हिंपुटी होऊन सरपटतो आहे
अशा वेळी;
कुणी समुद्र होऊन माझ्याकडे झेपावला तर मी काय करावे ?
काळोखाच्या अस्वली गुदगुल्यांनी माझ्या अंगावर फुलले रोमांच
नि संवाद–विसंवादाचे वेल्हाळ किनारे ओलांडून
नाम–सर्वनाम–विशेषणांची संदर्भपिसे अल्लद गळून पडल्यावर
हाच समुद्र मला लाटांवर जोजवत अज्ञात प्रदेशात
—नेईल का ?

जिथे अवघे आकाश कवटाळण्यासाठी स्वप्नांची
वाट पहावी लागणार नाही.
इतकेच नव्हे तर समजा;
अ आ इ ई पासून ह ळ क्ष ज्ञ पर्यंतची मुळाक्षरं नि–
तिने मला दिलेल्या दृढ अलिंगनाला बावरलेल्या जास्वंदासारख
पायदळी तुडवीत मी समोरच्या अरण्यात अदृश्य झालो तर,
मला क्षमा कराल काय ?
समजा, या अरण्यातून ज्वाळेप्रमाणे बाहेर पडू पहाणाऱ्या हाकेने
मला वेटाळले तर मी विचारीन,
हा समुद्र कोणता ? या समुद्राचे अरण्य कसे झाले ?
ही हाक कुणाची ? आताच उडाला झाडांचा थरकाप तो कशामुळे? —
—नि हे कुंद वारे ?

या वाऱ्यातून मला ऐकू आले सायंप्रार्थनेचे सूर
तर हा गुंता सोडवून मी कुठे जाऊ ?

या अरण्याचेच बरे असते :
आपण ठरवू तीच वाट असू शकते
शिवाय आपल्या मागून येणाऱ्या कुणा मुसाफिरासाठी
स्वतःच मिणमिणत राहून वाटेला पुढे नेता येते.

## ३६. हे शहर आणि आपण

किनाऱ्यावर एकटेच झाड नि पुढे नुसताच समुद्र पाहून मी रेंगाळलो
मागे अंक असला तरच पुढील शून्याला किंमत येते
असे समीकरण बनवून मी शहराच्या वेशीपाशी थबकलो
तेव्हा पाखरं परतायला लागली होती.

समुद्राची बेमुर्वत चिरफाड करीत जाणारे पाणघोड्यांचे तांडे
पाठीवर घेऊन तू स्वप्नाचे नाळ कापून टाकलेस
तेव्हा कधी कधी रक्तदेखील पाण्यापेक्षा पातळ असू शकते हे उमजले
आपण या शहरापाशी आलो तेव्हा हे शहर चांदण्यात निथळत होतं
आता हे शहर आणि आपण :

शहरात प्रवेश करण्यापूर्वी काही अटी लादून घेणं आलंच
काळे पक्षी दर्भकावळेसुद्धा असू शकतात हे डोळे मिटून मान्य करायचं
अवेळी मोहोरलेले वृक्ष नि सूर्याकडे पाठ फिरवलेली
सूर्यफुले पाहून अस्वस्थ व्हायचं नाही
सर्व दिवे मालवून अंथरूणावर पडताना,
अंधारातून प्रकाशत जाणाऱ्यांची आठवण बिलकुल करायची नाही
कारण आयुष्य वल्हवीत किनारा गाठताना चांदण्यांची आकडेमोड
निरर्थक असते.

आता पुन्हा एकदा सांगतो;
आपण या शहरात आलो तेव्हा हे शहर कूस बदलून उत्तरस्वप्ने
पहात होते
तिच्या बर्फाळ आठवणींचा खडा पहारा माझ्या थडग्यावर होता
आता हे शहर आणि आपण.


बावरलेल्या फुलांचे रंग उडून जाताना वाटावाटांतील अंतर—
दूरावत गेले
हे शहराचे व्यवच्छेदक लक्षण मानता येईल किंवा कसे,

हा प्रश्न आपण वठलेल्या फांद्यांना लटकलेल्या वटवाघळांवर
सोपवला
तेव्हापासून हे असे दरवेशी बनून दिशा चुकवणे चाललेय.

मित्रा; ही झडलेली झुडपे नि त्यांना बिलगलेली वारूळे पाहून
दचकू नकोस
कधीकाळी जेव्हा दिशांना नावे नव्हती तेव्हा इथलीच मुठभर
ओली माती घेऊन त्यात मी माझे श्वास पेरले होते
तुला ही एक दंतकथा वाटेल. असो.
एखाद्याच्या वाटचाला सगळीकडेच डेड एंड्स् का यावेत असा
प्रश्न मी कदापी विचारणार नाही.
तूर्त हे शहर आणि आपण.

## ३७. मी अनिरुद्ध

वाटा : स्वत:चं देहभान ओढाळपणे हरवणाऱ्या
दुपार : कलंडल्या उन्हात विझूविझू आलेल्या सावल्यांची
वारे : दिशांतील शेंदूर कोरून अंगावर परिधान करणारे
मी : तमाम प्रहरनक्षत्रांनी त्रिवार नाकारलेला
वैशाखवणवे सावरताना थिटे पडलेले आजानुबाहू
पेटवित गेलो नसानसातून युगारंभाचे रौद्र गान
कंठशोष होईस्तो गायले पूर्वासुरीचे व्यासपर्व
मी असा रेषारेषांत आयुष्य चितारीत चाललोय.
रेषारेषांचा गुंता माझ्याभोवती
मी. रेषा. रेषा. मी.
मी एकचएक रेषा
चिध्याचिध्यांच्या लोचट गाठी. रेषांना बांडगुळं
मी – माझे तमाम श्वास – माझी पावलं रेषाबद्ध
मी उंट झालोय नि रेषा वाळू झालीय
वाळू. उंट. रेषा. –– वाळवंट.
अखेर ओॲसिस : चित्रात रेखाटल्याप्रमाणे तटस्थ
( स्वर्ग दोन बोटे ! )
उन्मन होऊन उपसल्या शोककळा अनाहूतपणे
पण निबर मुद्रेचं ओॲसिस तसूभरही ढळलं नाही
म्हणालं; " तू अगदीच नवशिका दिसतो, पूर्वी असं कुणी केलं नव्हतं.
वेड्या, उंटानं वाळवंटाशी का भांडायचं असतं ? "
––मी : सांप्रत एक अनिरुद्ध – अ – नि – रु – द्ध.



## ३८. रस्ते

स्वप्नांची धुवट चिरगुटे अंगाखांद्यांवर मिरवीत ढेपाळलेले हे रस्ते...
रस्त्यांना नावे ठेवली जातात – नावांची उचलेगिरीसुद्धा होते
प्रेताला शृंगारावे तसे रस्ते शृंगारले जातात, कागदी पुष्पवृष्टी केली जाते
जुने रस्ते रुंदावतात. रोडावतात, उखडले जातात
काही अकाली वृद्ध होऊन मोडीत निघतात.

काहींना मलमपट्टी रंगरंगोटी करून मोहरमचे वाघ बनवले जाते
काही जहाल रस्ते आडवळणे घेऊन चक्क घुसखोरी करतात
त्यांना राजमार्ग म्हणून मानमान्यता प्राप्त होते
काही सरळसोट – एकमार्गी; काही तर राखीव ठेवले जातात.

कुत्र्याच्या शेपटीवाणी वळवळणारे रस्ते गल्ल्यागल्ल्यांशी चाळे करतात
रस्त्यांवर खून – बलात्कार – साठमारी . . . काहीसुद्धा होऊ शकते
कळ दाबली की रस्ते हसतात–रडतात; सामुदायिक शांतता पाळताना–
आपापसात कुजबुजतात.

तमाम रस्ते मात्र जातीधर्माचे पालनपोषण कसे शिस्तीने करतात !
रस्त्यांच्या ठरीव मर्यादा असतात; रस्त्यांनी गलका करू नये म्हणून—
त्यांच्या नाकाडांवर छापील नामफलक कोरलेले असतात.
रस्त्यांची गल्लत होऊ नये म्हणून रस्त्यांवर दिवे लावले जातात.
तरी रस्ते बापुडे आपल्या डोळ्यातील हरवलेल्या बाहुल्या चाचपडत
असतात.

इतके करूनही समजा चार रस्ते एकत्र आलेच तर—
चौकात हुतात्मा शस्त्रसज्ज असतो – त्यांची पांगापांग करायला !
काही रस्ते कधीकाळी भुईनळचांनी पेटलेच तर ते तत्काळ विझवले
—जातात नि रस्ते विझतात.

रस्ते विझतात.... कारण त्यांना सहिष्णू संस्कृतीची परंपरा जतन
करावीच लागते
ते विझताना त्यांना पेटविणाऱ्या महाभागांची राखरांगोळी करायला
ते विसरत नाहीत.
–अहो अशा रस्त्यांची तैनाती फौज बाळगली जाते !
तरी रस्ते किती अटळ ?
रस्ते माझ्या नाकातोंडातून–रक्तपेशीतून सर्पटताहेत
रक्तातसुद्धा भेसळ असू शकते रक्ताळलेल्या रस्त्यात तर अधिकच.

रस्त्यांचा गुंता माझ्या कंठाभोवती नि माझा टाहो वांझ
मी आता विझलो आहे नि रस्तेच वहाणाराहेत माझी अंतिम महायात्रा.


## ३९. घोडेस्वार

फुलांचे प्रदेश चौखूर उधळीत घोडेस्वार या रस्त्यावरून अपरात्री जातात
कुणाच्याही दारावर थाप मारून त्याला नावाने पुकारतात
कुणी ओ दिली तर त्याचा तत्क्षणी मुडदा पडतो
—अशी आवई गावभर पसरलेली.
त्या मुर्दाड घोडेस्वारांनी चंद्रकोरीने लिंबोणीचे रान भुईसपाट–
करून टाकल्याचेसुद्धा कुणी कुणी कुजबुजतात.
एकदा त्यांनी माझ्या दारावर थाप मारली
पण पुढे विशेष काहीच घडले नाही
तिच्या ओठांचे ठसे लेवून सकाळ उगवली एवढेच.
निबिड प्रदेशातून येणारी गतजन्मीची धून मी स्वप्नात
अनुभवत असतानाच
ते पुन्हा एकदा आले
दारावर थपडा मारून आपापसात वादंग घालू लागले
: आयुष्याची मशाल पेटवून ज्यानं पाखरांना गाणं बहाल केलं—
त्याच्या शोधात आम्ही आहोत : —त्यांचा मुख्य कडाडला.
मग मी माझ्या कवितांची होळी केली
स्वत:ला पेटवून मुकाट्याने दार उघडले
माझ्या पेटत्या देहाची मशाल विजयपताका म्हणून मिरवीत
घोडेस्वारांचा जथा सुसाट निघाला.

## ४०. क्षितिज

दूर दूर जाणारे हे लोभसवाणे क्षितिज
क्षितिजाचे देखिल एक गाणे आहे
क्षितिज स्थिर दिसते
क्षितिज पुढे पुढे सरकत आहेसे वाटते
क्षितिज सर्वांना सामावून घेते
क्षितिज सर्वांना पुरून उरते
क्षितिज सर्वांचे असते.

क्षितिजाचे कोण असते ?



## ४१. सूर्योदय

आकाशात केशरी सडा पडतो
झाडाला सोडून जातं एखादं पाखरू
झाड पहातं आपले मरण आपल्या दिठीने
तरीही उंचावत रहातं एकेक डहाळी
आकाशाच्या दिशेने
अशाच कुणा दुखऱ्या पाखराच्या विसाव्यासाठी.



## ४२. तांडा

आटपाटनगरातील तथाकथित नामांकित सारस्वताने
ज्यांच्यावर चित्तरकथा लिहून नावलौकिक मिळविला
महोत्सवी कविता रचून सभासंमेलनं दणाणून सोडली
आयुष्याची सर्कस वेशीवर टाकून पारितोषिकं पटकावली;
त्या निगरगट्टांचा तांडा अवचितपणे त्याच्यासमोर उभा राहिला
त्यांच्या डोळयांतून फुफाटल्या होत्या फांद्या वटवाघळांनी लगडलेल्या
भादरलेल्या कानांतून अंकुरले होते कागदीफुलांचे नागवेल :
त्यांची यच्चयावत तोंडे सीलबंद नि बोथटलेली नाके फुरफुरत होती:
शेपट्या उंचावून ते कसे तालासुरावर नाचत होते !
त्यांच्या हातांचे अंगठे मात्र बेपत्ता होते
सारस्वताच्या हातातील लेखणी मोडून पडली
तोंडाचा आ वासून तो तांड्याला सामोरा गेला नकळत
पण तांड्याने त्याला तत्काळ वेढले
—त्याचेही तोंड सीलबंद नि बोथटलेले नाक फुरफुरत होते.



## ४३. मी

सूर्यपुत्रांना बंदिस्त करू पहाणाऱ्या महाभागांची
भाटगिरी करण्यापेक्षा
मी ताठ मानेने फाशी जाईन.
ज्यांना अंकुरता येत नाही त्यांच्यासाठी
मी पुन्हा एकदा फळांनी वाकलेले झाड होईन.

## ४४. आपुल्याच वेदनांचा

आपुल्याच वेदनांचा
किती करावा सांभाळ
कसे पुसावे वांझेला
कुठे कापावी ही नाळ ?

पैलतीरावरी नाही
कुणा पाखराचे गाणे
किती फेडीत बसावे
जन्मोजन्मीचे हे देणे ?

# ४५. गाण्याचा समुद्र ओलांडताना

: १ :

गाण्याचा समुद्र ओलांडताना कुणी कसे जाळे फेकतील
याचा भरवसा देता येत नाही
म्हणून मैफिल संपण्यापूर्वीच गाऊन घ्यावे
म्हणजे बुडत्या नौकेत बसण्याची पाळी येत नाही
अन् शापित गंधर्व म्हणून आपल्याकडे कुणी बोट दाखवीत नाही.

: २ :

दूरस्थ साजणाऱ्या आगमनासारखा वहर
उगवतीच्या झाडांनी गोंदवून घेतला
पंखांवर आभाळ तोलणारं अनाम पाखरू
मावळतीच्या डहाळीवर क्षणकाल विसावलं
झिम्मड पावसात दिशा विझूविझू येताना
धुमसणाऱ्या चितेतील लाकडं अवचित पेटली
गाण्याचा समुद्र ओलांडताना,
रातकिड्यांचे किर्र रान सभोवती उभे राहिले
ताठरलेल्या कंठाने ऋतुंचे दफन करून
ए
के
क
गाणे

समाधीवर गुलाली फूल म्हणून वाहिले.

त्या पहिल्या भेटीसाठी

## ४६. अकल्पित प्रदेशातील झिमझिम पाऊस

अकल्पित प्रदेशातील झिमझिम पाऊस
साजण बनून तिला साद घालतो
ती पिसागत हलखं होऊन तरंगत जाते

तिने पाहिली अकल्पित प्रदेशातील झाडे मोहरलेली
नि डोहाळे लागलेल्या वेली गुजगोष्टी करताना

ओहो ! हे डहाळीवर बागडणारे मुकुलपाखरू
कसलं गाणं गात आहे !
ही डोहाळे लागलेली कळी कशी पानाआड लपते आहे ! ...

... अकल्पितपणे पाखरांचा थवा कलकलाट करीत
तिला पालाण घालून भिरभिरत गेला
ती गाण्याचे नुपूर पायात बांधून
झिमझिम पाऊस धूसर होत जावा तशी
स्वतःलाच अनोळखी होत गेली.

## ४७. एकेक फूल वेचताना

अेकेक फूल वेचता वेचता
ती चंद्रकळेगत कधी फुलून गेली
नि असंख्य पाखरांचे कोरसगाणे–
गाऊ लागली
हे तिलाच उमजले नाही
फुलांच्या जडभाराने अनावर होऊन
ती बेहोष होण्याअगोदरच
त्याने
तिला फुलागत अल्लद झेलले.

## ४८. आपण समजतो तितके

आपण समजतो तितके
सोपे नसते आपले भेटणे
जसे की; या झाडांचे उत्सव
ऋतुमानानुसार

आपले विलगणे मात्र
इतके सहज की;
भरती ओहोटीचे चक्र
चंद्रकळेनुसार.

हे उमलणं-कोमेजणं
फुलदाणीतील फुलाप्रमाणं आहे
हे तुला कधी पटेल?

अंगणातील परदेशी पाखरांना
दाणे घालण्याचा तुझा
हव्यास तू कधी थांबवणार आहेस

स्वतःलाच जखम करून
अनुबंध तीव्र करण्याचा
तुझा खेळ अजबच म्हणायचा!

## ४९. अयाचित

मी तुझ्याकडं कधी काहीच मागितलं नव्हतं
तू सर्वस्व द्यायला समुत्सुक कशी झालीस ?
तुझे सूर्यविकासी लावण्य भितीचे घर कोरते
मी गंमतीने जमवलेली चंद्रशिल्पे
इंद्रधनुष्य फुलवताहेत तुझ्या बिल्लोरी डोळ्यांत
मृगाची पहिली सर होऊन बरसतेस तू
मी बालकवींचा औदुंबर आहे – तू चिमटे काढून
म्हणत्येस
म–मला माहित नाही; पण तू फुलराणी आहेस हे नक्की.
–अन् सारखा करतोय तुझा ढळलेला रेशमी पदर.

REFBK-0022972
REFBK-0022972

## ५०. स्वतःपासून वेगळा होऊन—

देठापासून एकेक फूल विलगताना,
कळ्यांचे बंदिस्त निःश्वास आठवून डहाळी अपरंपार थर्रकापते.

माथेफिरूने छेडलेल्या सतारीतून प्रलयंकारी लाटांचे थैमान
अंधारात दबा धरून बसलेल्या जखमी श्वापदाप्रमाणे
अंगावर झेप घेण्याअगोदरच
स्वतःपासून वेगळा होऊन तुझ्याकडे झपाझप येताना
ठेच लागून रक्तबंबाळ झालेल्या पायाच्या अंगठ्यावर
प्राणांतिक आघात होतात
मी अपरंपार थर्रकापणाऱ्या डहाळीचा आधार घेतो.

रंग उडून गेलेल्या वस्त्राप्रमाणे नाकारलेले हे विमनस्क गाव
अंगावर कुणी पाणी फेकल्यामुळे हिव भरलेले मांजराचे पिल्लू बनून
माझ्या भगव्या कुशीत निवारा शोधते.
अशा एकाकी संधीप्रकाशात झाडे वनवासी बनून इतकी कंगाल की;
ओसाड ओढ्याची खळाळगाणी हुंदके विरल्यागत
नि पक्षी माना टाकून विकलमौन.

पडक्या मंदिराची भंगलेली घंटा कुणी फकीर बडवीत आहे
गाभाऱ्यातील मूर्तीचे टवके उडून एकेक अवयव –
जिव्हारी घाव घातल्यागत धडावेगळे होताहेत
फकिराचे भेसूर हसणे आसमंतात पेटवतंय वणवा.

मी स्वतःपासून वेगळा होऊन तुझ्याकडे झपाझप येताना
त्या डहाळीवरील कळ्यांची आता फुले होताहेत .....

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
काव्य
दा. क्र. २२०७२
२४३२
ग्रंथ शाखा (स्थळ)